साप्ताहिक

# निर्भीड वर्तमान

निडर लेखनी, निष्पक्ष बातमी.!

PRGI No. MAHMAR/2023/90686 | संपादक : सौ. अश्विनी श्रीकांत दारोळे | Web : www.nirbhidvartmaan.com

वर्ष २ ले | अंक ५२ | शुक्रवार, दि. ५ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२५ | मुल्य : २ रु | पाने ४


## ‘माती’च्या बदल्यात लाच घेताना महिला मंडलाधिकारी एसीबीच्या जाळ्यात! भोरमध्ये १ लाखासह रंगेहाथ अटक

**पुणे:** पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भोर तालुक्यात धडाकेबाज कारवाई करत एका महिला मंडलाधिकारीला १ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. कायदेशीर परवाना असूनही 'सहकार्य' करण्याच्या बदल्यात ही लाच मागण्यात आली होती.

एका तरुण व्यावसायिकापासून, ज्याने भोर तहसील कार्यालयातून माती वाहतुकीचा पूर्णपणे वैध परवाना घेतला होता आणि त्यासाठी लागणारी सर्व सरकारी रॉयल्टी देखील भरली होती. तरीही, निगुडघर मंडळाच्या मंडलाधिकारी रूपाली गायकवाड यांनी या व्यावसायिकाच्या गाड्या अडवल्या. त्यांनी व्यावसायिकाला स्पष्टपणे धमकी दिली की, व्यवसाय चालू ठेवायचा असेल तर तुम्हाला १,५०,०००/- (दीड लाख रुपये)



द्यावेच लागतील.

या त्रासाला कंटाळलेल्या व्यावसायिकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे गाठले. एसीबीच्या टीमने (पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर आणि टीम) लगेच सापळा रचण्याची तयारी केली. पडताळणीमध्ये मंडलाधिकारी रूपाली गायकवाड यांनी लाचेची मागणी १,००,०००/- (एक लाख रुपये) वर आणल्याचे सिद्ध झाले.

सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास, रूपाली गायकवाड यांनी लाचेचे पैसे घेण्यासाठी व्यावसायिकाला भोर शहराबाहेर, 'अभिजित मंगल कार्यालयाजवळ' रोडवर बोलावले. जसा व्यावसायिकाने त्यांच्याकडे १,००,०००/- रोख रक्कम दिली, त्याच क्षणी दबा धरून बसलेल्या एबीसीच्या टीमने त्यांना रंगेहाथ पकडले!

लाच घेताना पकडल्यानंतर लगेचच मंडलाधिकारी रूपाली गायकवाड यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार (१९८८) गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया भोर पोलीस स्टेशनमध्ये सुरू करण्यात आली. पुणे एबीसीने ही मोठी कारवाई यशस्वी करून, शासकीय कामात लाच मागणाऱ्यांसाठी एक कडक संदेश दिला आहे.

## ’पीएनजी ज्वेलर्स’ला बनावट अंगठीने फसवणारा चोरटा ‘रंगेहात’ जेरबंद

**पुणे:-** पुण्यातील नामांकित ज्वेलरी शॉप्सना बनावट दागिन्यांच्या मदतीने फसवून लाखो रुपयांचे सोने चोरणाऱ्या एका भामट्याला विमानतळ पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. हा आरोपी दुसऱ्या एका दुकानात चोरी करण्याच्या बेतात असतानाच पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

नेमकी घटना काय घडली?

दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास विमाननगर येथील पीएनजी ज्वेलर्सच्या शाखेत एक व्यक्ती आला. त्याने अत्यंत चलाखीने सोन्याच्या दागिन्यांच्या ट्रेमधील १ लाख रुपये किमतीची सोन्याची खरी अंगठी चोरली.

चोरी करताना या आरोपीने हातातील बनावट अंगठी ट्रेमध्ये ठेवली आणि खरी अंगठी घेऊन हातचलाखीने पसार झाला. ही फसवणूक लक्षात येताच विमानतळ पोलीस स्टेशनमध्ये तातडीने तक्रार दाखल करण्यात आली.

पोलिसांनी लावला सापळा

या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांनी तात्काळ तपास पथकाला आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले. विमानतळ तपास पथकाने गोपनीय माहिती व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला.

तपास सुरू असतानाच पोलिसांना अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली: हाच आरोपी ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुन्हा औंध येथील पीएनजी ज्वेलर्सच्या शाखेत चोरी करण्यासाठी येणार आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी औंध शाखेजवळ सापळा रचला आणि आरोपीला तिथेच रंगेहात पकडले.

अटक आणि गुन्ह्यांची कबुली

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव सैफ दिलीप बेळगावकर (वय २९, रा. वानवडी, पुणे) असे आहे.

पोलिसांनी त्याला विमानतळ पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक केली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पोलिसांनी आरोपीकडून चोरी केलेली १ लाख रुपये किंमतीची सोन्याची अंगठी यशस्वीरित्या हस्तगत केली आहे.

तपासादरम्यान असे उघड झाले आहे की, या आरोपीने पुणे शहरातील अशाच प्रकारे अनेक सराफ व्यावसायिकांना बनावट दागिन्यांच्या मदतीने फसवले आहे. पोलीस या संदर्भात अधिक तपास करत आहेत, जेणेकरून त्याचे इतर गुन्हे उघडकीस येतील.

यशस्वी कारवाई पथक

ही महत्त्वपूर्ण कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील (पुर्व प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उपायुक्त सोमय मुंडे (परि. ०४) आणि मा. सहा. पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव आणि पोलीस निरीक्षक शरद शेळके यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकामध्ये पोलीस उप-निरीक्षक नितीन राठोड, मनोज बरुरे, आणि पोलीस अंमलदार योगेश थोपटे, ज्ञानदेव आवारी, रुपेश पिसाळ, शैलेश नाईक, दादासाहेब बर्डे, हरीप्रसाद पुंडे, लालु क-हे, राहुल जोशी, अंबादास चव्हाण, सागर कासार, पांडुरंग म्हस्के, व शंकर वाघुले यांचा समावेश होता.

## पुणे पोलिसांची धडक: लोणीकाळभोरमध्ये १.५ कोटींहून अधिक किमतीचा बनावट गुटखा कारखाना उध्वस्त

**पुणे:** आपल्या शहरात विषारी बनावट गुटख्याचा व्यवसाय गुपचूप चालवणाऱ्यांवर पुणे पोलिसांनी ४ डिसेंबर २०२५ च्या रात्री जोरदार कारवाई केली आहे.

पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेतील अंमली पदार्थ विरोधी पथक-२ चे अधिकारी (पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली) एका अत्यंत महत्त्वाच्या गुप्त माहितीवर काम करत होते. ही माहिती होती- लोणीकाळभोर पोलीस स्टेशन हद्दीतील थेऊर फाटा येथील कांबळे वस्तीमध्ये असलेल्या एका गोदामात नकली गुटखा तयार केला जातोय.



पोलिसांनी तत्काळ त्या गोदामावर छापा टाकला. बाहेरून शांत दिसणाऱ्या या ठिकाणी आतमध्ये धक्कादायक चित्र होते- प्रसिद्ध ब्रँड्ससारखा दिसणारा बनावट 'आर.एम.डी.' आणि 'विमल' गुटखा तयार करण्याची मोठी फॅक्टरी सुरू होती! गोदामाच्या बाजूला असलेल्या शेतात बनावट सुपारी, केमिकल, सुगंधी तंबाखू आणि छापलेले रिकामे पाऊच (झीळपींशव झींलहशी) असे प्रचंड प्रमाणात कच्चा माल साठवलेला होता.

पोलिसांनी या ठिकाणाहून गुटखा, तंबाखू आणि कच्चा माल जप्त केला, ज्याची किंमत १ कोटी रुपये होती. तसेच, हा अवैध माल शहरात पोहोचवण्यासाठी वापरण्यात येणारी दोन इनोव्हा आणि एक टाटा नेक्सॉन अशा तीन 'मॉडिफाय' केलेल्या चारचाकी गाड्या जप्त करण्यात आल्या, ज्यांची किंमत ५० लाख रुपये आहे. सोबत १ लाख ३० हजार रुपये रोख रक्कमही मिळाली.

या कारखान्याचा मुख्य मालक रोहित दुर्गादास गुप्ता (वय २५) आणि त्याचे तीन कामगार (रामप्रसाद, अप्पु आणि दानिश) यांना पोलिसांनी जागेवरच ताब्यात घेतले. नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असलेला हा बनावट माल तयार केल्याबद्दल आरोपींविरुद्ध लोणीकाळभोर पोलीस स्टेशनमध्ये कठोर कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ही एकूण १ कोटी ५० लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्याची यशस्वी कारवाई पार पडली.

## SC/ST (अत्याचार प्रतिबंध) कायद्यातील खून/मृत्यू प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या पात्र वारसांना शासकीय नोकरी मिळणार

- **मुंबई उपनगर जिल्ह्यात १० डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन**

**मुंबई:-** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ (सुधारीत अधिनियम, २०१५) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या प्रकरणांतील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी देण्याची महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे. मुंबई उपनगर सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने यासंदर्भात २० नोव्हेंबर २०२५ रोजी शासन निर्णय (जी.आर.) जारी केला असून, या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र वारसांना १० डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**शासकीय निर्णयाचे स्वरूप**

मुंबई उपनगर सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने जारी



केलेल्या या शासन निर्णयामुळे अत्याचारग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. ज्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या व्यक्तीचा खून किंवा अत्याचारामुळे मृत्यू झाला आहे, अशा कुटुंबातील एका पात्र वारसास थेट शासकीय सेवेत किंवा निमशासकीय सेवेतील पदावर नोकरी देण्यात येणार आहे. अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील पीडितांना न्याय आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे, या उद्देशाने ही तरतूद करण्यात आली आहे.

**अर्ज करण्याची अंतिम मुदत:**

मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी सर्व पात्र वारसांना तातडीने या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १० डिसेंबर २०२५ ही निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र कुटुंबांनी आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

योजनेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी पात्र वारसांनी खालील कार्यालयाशी संपर्क साधावा:

कार्यालय: सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर

पत्ता: नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर. चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१

पात्र लाभार्थ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी संपर्क साधून या महत्त्वपूर्ण शासकीय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.

१० डिसेंबर २०२५ ही अर्ज करण्याची अंतिम मुदत लक्षात घेऊन संबंधित पात्र वारसांनी त्वरित कार्यवाही करावी.

# संपादकीय

## विक्रमवीर 'रो-को'!

भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा व विराट कोहली यांच्या अनेक झंझावाती व स्फोटक खेळींनंतर क्रिकेट विश्वात त्यांच्याबद्दल 'रोक सको तो रो-को' अशी आव्हानात्मक घोषणा प्रचलित झाली आहे. अर्थात खेळाडूंचे वय जसे वाढत जाते तसे त्यांचा अनुभव वाढतो पण शारीरिक क्षमता कमी होण्यास सुरुवात होते.

कोहली व रोहित हेही याला अपवाद नाहीत व त्यांनी स्वत:ला तसे मानलेही नाही. त्यामुळे दोघांनीही अगदी वेळेत आणि लयीत असतानाही क्रिकेटच्या कसोटी व टी-२० प्रकारापासून स्वत:ला दूर करण्याचा निर्णय घेत युवा खेळाडूंना वाट करून दिली. मात्र, आपल्या देशात दोन क्षेत्रातले 'गॉसिपिंग' अत्यंत प्रिय आहे आणि त्यात चित्रपट क्षेत्र व क्रिकेटचा नंबर लागतो. त्यामुळे साहजिकच 'रो-को'च्या संदर्भानेही गॉसिप्सचा महापूर सुरू असतो.

प्रत्येक दौ-यासाठीच्या संघ निवडीपासून त्या दौ-यातील प्रत्येक सामन्यात या दोघांच्या खेळीबाबत उलटसुलट बातम्या, मते, तर्क व्यक्त होत असतातच! त्यातूनच २०२७ च्या वन-डे विश्वचषकात ही दिग्गज जोडी भारताकडून खेळताना दिसणार की नाही? यावर सध्या दर सामान्यागणिक जोरदार चर्चा झडतायत! त्यात बीसीसीआय 'रो-को'ला त्यांचे वाढते वय लक्षात घेऊन देशांतर्गत सामने खेळण्याचा सल्ला देऊन अशा चर्चांना आणखी हवा देतेय! मात्र, या सगळ्या चर्चा झडताना किंवा करताना ही बाब दुर्लक्षित होता कामा नये की आज रोहित शर्मा व विराट कोहली क्रिकेट क्षेत्रात ज्या स्थानावर आहेत तिथे पोहोचण्यासाठी खेळाडूत प्रचंड गुणवत्तेबरोबरच कठोर मेहनत, सातत्य, आपल्या खेळावरचे प्रेम आणि त्या खेळात उत्तम योगदान देण्याची न संपणारी भूक या गोष्टींचा व गुणांचा समन्वय हवा. यातील एकाही गोष्टीचा अभाव त्या खेळाडूस लगेच परतीच्या वाटेला लावू शकतो. 'रो-को'मध्ये या सगळ्या गुणांचा योग्य समन्वय आहे आणि म्हणूनच ते 'लिजेंड' बनलेत व प्रत्येक खेळीबरोबर नवनवे विश्वविक्रम नोंदवून विक्रमवीर ठरतायत. मोठ्या विश्रांतीनंतर एकदिवसीय कारकीर्दीच्या नव्या आव्हानावर विराट व रोहित मोठ्या आत्मविश्वासाने आरूढ झाले आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन सामन्यांत निराशाजनक कामगिरी केल्यावर अखेरच्या सामन्यात कोहलीने अर्धशतकी तर रोहितने शतकी खेळी केली होती. तीच लय कायम ठेवताना या जोडीने रविवारी द. आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात चाहत्यांना पुन्हा एकवार तुफानी 'रो-को'शोचे दर्शन घडविले. 'रो-को'च्या भविष्याबाबत तर्क-वितर्क व्यक्त करणा-यांना आपल्या बॅटने उत्तर देताना कोहलीने विश्वविक्रमी ५२ वे एकदिवसीय सामन्यातील शतक झळकावले तर रोहितने अर्धशतकी खेळी करताना जागतिक सिक्सर किंग होण्याचा विश्वविक्रम आपल्या नावावर केला. विराटने ५२ वे वन-डे शतक ठोकताना क्रिकेटच्या एका प्रकारातील सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम आपल्या नावे केला. त्याने क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरचा कसोटी क्रिकेटमधील ५१ शतकांचा विश्वविक्रम मागे टाकत नवा विक्रम नोंदविला. अवघ्या १२० चेंडूंत ११ चौकार व ७ षटकारांसह विराटने १३५ धावांची दमदार खेळी केली आणि कसोटी सामन्यातील निराशाजनक पराभवाने मरगळून पडलेल्या भारतीय फलंदाजीत जोरदार आत्मविश्वास भरला. हीच दिग्गज खेळाडूंची खासियत असते. ते स्वत:च्या खेळीने संघाला केवळ सुस्थितीत पोहोचविण्याची जबाबदारी पार पाडत नाहीत तर संघातील प्रत्येक खेळाडूला उत्तम खेळाची प्रेरणा व आत्मविश्वास देतात. 'रो-को' शोने हेच घडवले आणि कसोटी सामन्यात सपशेल शरणागती पत्करलेल्या भारतीय संघाने थेट विजयाचा रस्ता धरून द. आफ्रिका संघाला जमिनीवर आणले. वन-डेतील सर्वाधिक शतके ठोकणा-या फलंदाजांत कोहली अगोदरच ५१ शतकांसह अव्वल स्थानावर होता. त्यात आता विश्वविक्रमी ५२व्या शतकाची भर त्याने टाकली आहे. ४९ शतकांसह सचिन तेंडुलकर दुस-या क्रमांकावर तर ३३ शतकांसह रोहित शर्मा तिस-या क्रमांकावर आहे. ३० शतकांसह ऑस्ट्रेलियाचा रिकी पाँटिंग चौथ्या तर २८ शतकांसह श्रीलंकेचा सनथ जयसूर्या पाचव्या क्रमांकावर आहे. वन-डे मध्ये कोहलीने मायदेशात २५ शतके ठोकली असून हा टप्पा गाठणारा तो पहिला फलंदाज ठरला आहे. ५२ वे विश्वविक्रमी शतक झळकावताना विराटने आपले द. आफ्रिकेविरुद्धचे ६ वे शतक झळकावले आहे. या क्रमवारीतही त्याने ५ शतके झळकावणा-या सचिन तेंडुलकरला मागे टाकले. आता कोहलीची वन-डे कामगिरी ३०६ वन-डे मध्ये ५८.०२ च्या सरासरीने ५२ शतके व ७५ अर्धशतकांसह १४३९० धावा अशी डोळे दिपवून टाकणारी आणि खेळाडू म्हणून त्याचा 'क्लास' सिद्ध करणारी झाली आहे. तर याच सामन्यात रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार ठोकण्याचा शाहिद आफ्रिदीचा ३५१ षटकारांचा विश्वविक्रम मोडित काढून ३५२ षटकारांचा नवा विश्वविक्रम नोंदविला आहे. शाहिद आफ्रिदीला ३५१ षटकारांचा विश्वविक्रम नोंदविण्यासाठी ३९८ सामने लागले होते. रोहितने केवळ २७० व्या डावात हा विश्वविक्रम मोडून नवा विश्वविक्रम स्थापन केला. या यादीत ३३१ षटकार ठोकणारा ख्रिस गेल तिस-या तर २७० षटकार ठोकणारा सनथ जयसूर्या चौथ्या स्थानावर आहे. २२९ षटकारांसह महेंद्रसिंह धोनी पाचव्या क्रमांकावर आहे. रोहितचा टी-२० मधील सर्वाधिक २०५ षटकारांचा विक्रम त्याच्याच नावे अबाधित आहे. रोहितने एका देशातील सर्वाधिक षटकारांचा विक्रम म्हणजे भारतातील १८२ षटकारांचा विक्रम आपल्या नावे केला आहे. एकंदर काय तर 'रो-को'च्या प्रत्येक खेळीनंतर आता नवे विक्रम स्थापन होत राहणे अटळ आहे. थोडक्यात विक्रमवीर सचिन तेंडुलकरचा समृद्ध वारसा हे दोघे समर्थपणे पुढे चालवत आहेत आणि म्हणूनच त्यांना नवे विक्रमवीर असे अभिमानाने संबोधणे हेच योग्य राहील, हे मात्र निश्चित!

## आत्महत्या की हत्या?

संपदा आणि गौरी या दोघीही उच्चशिक्षित होत्या, स्वावलंबी होत्या, तरीही त्यांना सामाजिक दबाव आणि छळाला तोंड द्यावे लागले. हे प्रकरण फक्त दोन महिलांचे नसून, संपूर्ण समाजाचे आहे. खून की आत्महत्या? हे उत्तर शोधण्यासाठी निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे.

बीडमधीलच पण फलटणमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असणाऱ्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्राचे वातावरण ढवळून निघाले असताना आता गौरी पालवे-गर्जे या आणखी एका डॉक्टर असणाऱ्या विवाहितेने आत्महत्या केली आहे. त्यालाही पार्श्वभूमी राजकीयच आहे. आत्महत्या केलेल्या डॉक्टरचा पती अनंत गर्जे हा मंत्री पंकजा मुंडे यांचा स्वीय्य सहाय्यक आहे. विशेष म्हणजे पंकजा मुंडे कधीकाळी महिला आणि बालविकास मंत्री होत्या. डॉ. संपदा मुंडे प्रकरणात पोलिसांचा आणि राजकीय मंडळींचा आपल्या मनानुसार काम करण्यासाठी असलेला प्रचंड दबाव आणि हम करें सो कायदा अशी मानसिकता होती. डॉ. गौरी प्रकरणात मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय्य सहाय्यकाची वादग्रस्त प्रकरणेच नव्हे, तर सत्तेचा माज आणि आपले काहीही वाकडे होऊ शकत नाही हीच मानसिकता होती. सत्तेच्या वर्तुळातून आलेल्या अहंकारातून दोन्ही तरुणींचा झालेला प्रचंड मानसिक व शारीरिक छळ हा आत्म-हत्येस प्रवृत्त करणारा होता. त्यामुळे याचा हत्येच्या अनुषंगाने तपास करायचा की आत्महत्या सांगून प्रकरण दाबून टाकायचे याचा न्यायाच्या नीतीने विचार व्हावा. गेले काही महिने महाराष्ट्रात रक्तरंजित उद्रेक सुरू आहे. कुठे कोयता गँगची दहशत, तर कुठे खंडणी, लूटमार, हत्या त्यांचे सत्र, तर कुठे आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. या सर्वांमधील समान धागा आहे तो सत्तेचा आणि पैशाचा माज. महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश वाटावा अशी ही परिस्थिती. सामाजिक, राजकीय सगळ्या वीण उसवून गेल्या आहेत. यातच बीड जिल्ह्यातीलच डॉक्टर महिलेची ही दुसरी अशीच वादग्रस्त आत्महत्या घडलीय ज्यामुळे खळबळ उडाली आहे. त्यामुळे या खरंच आत्महत्या आहेत की संस्थात्मक खून वा हत्या आहेत, असा प्रश्न उभा राहिला आहे.

अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी डॉ. गौरी यांचे लग्न अनंत गर्जे याच्याबरोबर झाले होते. बीड जिल्ह्यातील मोठे प्रस्त असणाऱ्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचा स्वीय्य सहाय्यक असल्याच्या प्रतिष्ठेतूनच हा विवाह झाला होता.

तिच्या वडिलांनीही हे मान्य केले आहे. त्या मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये दंतचिकित्सक म्हणून कार्यरत होत्या. डॉ. गौरी यांच्या आत्महत्येची घटना २२ नोव्हेंबर रोजी मुंबईतील वरळी येथील त्याच्या निवासस्थानी घडली. मात्र, कुटुंबीयांच्या तक्रारीनुसार, ही केवळ आत्महत्या नसून, मानसिक त्रास आणि छळामुळे घडलेला खून असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी या आत्महत्येवरही संशय व्यक्त केला आहे. आमची मुलगी आत्महत्या करूच शकत नाही. तिची हत्या करण्यात आली आहे, असे कुटुंबाचे म्हणणे आहे. वरळी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, गौरीचे वडील रामराव पालवे यांनी सांगितले की, अनंत गर्जे यांनी लग्नानंतर गौरीवर कौटुंबिक आणि आर्थिक दबाव टाकला. अनंतकडून सतत अपमानास्पद शब्द वापरले जात, तिच्या नोकरीबद्दल आणि कुटुंबाबद्दल टोमणे मारले जात. याशिवाय, अनंताचे भाऊ आणि बहीण यांच्याकडूनही छळ होत होता. गौरीला अनंतच्या विवाहबाह्य संबंधांबद्दल माहिती मिळाल्यानंतर त्याबद्दल विचारले असता, त्याच्या वागण्याबद्दल विचारले असता, त्याने उलट गौरीलाच 'मी आत्महत्या करेन आणि तुझीच चूक ठरवेन', अशी धमकी दिली होती.

या घटनेनंतर पोलिसांनी कलम ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल) अंतर्गत गुन्हा दाखल करून अनंत गर्जेला अटक केली आहे. या गुन्ह्याचा हत्येच्या अनुषंगानेही निपक्ष तपास व्हायला हवा. कारण अनंत गर्जे च्या दाव्यानुसार घटना घडल्यानंतर ज्या तिसाव्या मजल्यावरील घरात बाल्कनीतून त्याने घरात प्रवेश केला त्या बाल्कनीचे गजही वाकलेले नाहीत. कोणीही नसताना पोलिसांशिवाय बॉडी उतरवून हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्याचा प्रकार पुरावे नष्ट करणारा आहे. पोलिसांनी या सगळ्या प्रकाराचा निष्पक्ष तपास करणे आवश्यक आहे. तरच न्यायालयात हे प्रकरण टिकून मृतास न्याय मिळेल.

आत्महत्या केली तेव्हा संपदाने तळहातावर त्रास देणाऱ्यांची नावे लिहिली होती. तसेच त्याआधी आपल्यावर चुकीची कामे करण्यासाठी दबाव टाकणाऱ्यांची तक्रार वरिष्ठांकडे केली होती. पण त्यांच्यावर काही कारवाई झाली नाही. या दोन्ही घटनांमुळे बीड आणि महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. बीड हा जिल्हा आधीच कौटुंबिक हिंसेसाठी कुप्रसिद्ध आहे. २०२४ च्या राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालानुसार, महाराष्ट्रात दरवर्षी १०,००० हून अधिक कौटुंबिक हिंसेच्या तक्रारी दाखल होतात, यातील ३० टक्के बीडसारख्या ग्रामीण भागातील आहेत. डॉक्टरांसारख्या व्यावसायिक महिलांवर होणारा त्रास हा अधिक गंभीर आहे. संपदा आणि गौरी या दोघीही उच्चशिक्षित होत्या, स्वावलंबी होत्या, तरीही त्यांना सामाजिक दबाव आणि छळाला तोंड द्यावे लागले. हे प्रकरण फक्त दोन महिलांचे नसून, संपूर्ण समाजाचे आहे. खून की आत्महत्या? हे उत्तर शोधण्यासाठी निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे.

## स्थलांतरितांसाठीचे डेन्मार्क मॉडेल

जगातील अनेक देशांवर एकेकाळी राज्य करणाऱ्या ब्रिटनला सध्या स्थलांतरितांच्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. यासंदर्भात ब्रिटनने डेन्मार्क मॉडेल राबविण्याचे निश्चित केले आहे. काय आहे हे मॉडेल?

स्थलांतरित, घुसखोर आणि निर्वासितांच्या प्रश्नाने संपूर्ण जगच हैराण झाले आहे. जीव वाचविण्यासाठी, हाताला काम मिळवण्यासाठी, जीवन जगण्यासाठी आवश्यक त्या सुविधा मिळाव्यात, सुरक्षित वातावरण लाभावे यासाठी जगभर लोंढेच्या लोंढे इकडून तिकडे जात आहेत. यामुळे अनेक ठिकाणी गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सहाजिकच स्थानिक निवडणुकांमध्ये हा मुद्दा प्रकर्षाने उपस्थित होत आहे. मग त्यात बलाढ्य अमेरिका असो की चिमुकला मालदीव. सर्वच भागात आणि देशात स्थलांतरित डोकेदुखी बनले आहेत. ब्रिटनही त्यातून सुटलेला नाही.

अर्वाचीन इतिहास पाहिला तर प्रकर्षाने हे लक्षात येते की, स्थलांतर हा मानवाचा स्थायीभाव आहे. नदीकिनारी, पाणवठ्याजवळ, सुरक्षित वातावरणासाठी मानव सतत स्थलांतर करीत आला आहे. केवळ वृक्ष सोडले, तर सारेच सजीव स्थलांतराच्या अव्याहत प्रवाहात आहेत. ही निरंतर प्रक्रिया आहे. मात्र, औद्योगिकीकरणाने या स्थलांतराला नवा आयाम दिला आहे. त्यामुळे हा प्रश्न अधिक जटील झाल्याचे दिसून येते.

युरोपात स्थलांतरितांचा प्रश्न हा गेल्या दशकभरातील सर्वात ज्वलंत राजकीय मुद्दा ठरला आहे. २०१५ च्या शरणार्थी लोंढ्यानंतर अनेक देशांनी धोरणे कठोर केली, तर काहींनी मानवतावादी भूमिका कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही टोकांच्या दरम्यान डेन्मार्कचे स्थलांतरित व्यवस्थापन मॉडेल एक वेगळे आणि मिश्र स्वरूपाचे आहे. ज्यामध्ये कल्याणकारी राज्याची भक्कम परंपरा, संसाधनांचे काटेकोर व्यवस्थापन, राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक सहमती यांचा अनोखा मेळ दिसतो. हे मॉडेल नेमके काय आहे? त्याची तत्त्वे कोणती? त्यातील वादग्रस्त प्रश्न कोणते? आणि जागतिक स्तरावर तो धडा म्हणून पाहिला जाऊ शकतो का? याचा विचार अनेक देश करत आहेत.

डेन्मार्कमध्ये पारंपरिकरीत्या अत्यंत मजबूत कल्याणकारी प्रणाली आहे. आरोग्य, शिक्षण, गृहव्यवस्था, रोजगार हमी अशी अनेक सेवांची सार्वत्रिक उपलब्धता तेथे आहे. मात्र गेल्या दशकात निर्वासितांचा वाढता ओघ, सामाजिक ताण, आर्थिक भार आणि सांस्कृतिक समन्वय यांसंबंधी चिंता वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर डेन्मार्क सरकारने निर्वासितांसाठी तीन मोठ्या भूमिका घेतल्या आहेत. डेन्मार्कने निर्वासितांना खुले धोरण अवलंबलेले नसले तरी 'नियंत्रित प्रवेश' या तत्त्वाला प्राधान्य दिले आहे. आश्रय मागणाऱ्या सर्व अर्जांचा काटेकोर तपास केला जातो. स्वीकारायचा की नाकारायचा हा निर्णय केवळ मानवीय कारणांवरच नव्हे तर सुरक्षा, ओळख पडताळणी, स्थानिक संसाधनांवरील ताण आणि सामाजिक समाकलनाच्या शक्यतांवरही आधारित असतो. डेन्मार्कने 'स्थायी आश्रय' देण्यापेक्षा 'तात्पुरता आश्रय' देण्याला प्राधान्य दिले आहे. संघर्षात बदल झाल्यास किंवा त्यांच्या देशाची परिस्थिती सुधारल्यास शरणार्थ्यांना पुन्हा मातृदेशात परतण्यास प्रोत्साहन दिले जाते. हे धोरण वादग्रस्त असले तरी देशांतर्गत राजकारणात लोकप्रिय ठरले आहे. निर्वासितांना कल्याण सेवा मिळतात, पण त्याबदल्यात भाषा प्रशिक्षण, रोजगार प्रशिक्षण, स्थानिक मूल्यांचा अभ्यास आणि समाजातील सक्रिय सहभाग यांसाठी कडक निकष पाळावे लागतात. हा कार्यक्रम लवचिक नसून अनिवार्य आहे. डेन्मार्कने एक नवे आणि अत्यंत वादग्रस्त धोरण मांडून पाहिले. त्यात सुचवले गेले की, आश्रयासाठी डेन्मार्कमध्ये येऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना थेट स्वीकारण्याऐवजी त्यांचे अर्ज डेन्मार्कबाहेरच्या तृतीय देशात घ्यायचे व त्यावर प्रक्रिया घ्यायची. उदा. रवांडासारख्या आफ्रिकी देशात. अखेर हे धोरण रद्द करावे लागले. मानव तस्करीची साखळी तोडणे, स्थलांतराचे अनियंत्रित प्रवाह रोखणे आणि युरोपमध्ये अनधिकृतरीत्या पोहोचण्याचा 'प्रोत्साहन घटक' कमी करणे या धोरणावर मानवाधिकार गटांनी तीव्र टीका केली. त्यांच्या मते हे निर्वासितांच्या हक्कांचे संभाव्य उल्लंघन आहे. जबाबदाऱ्या इतर देशांवर ढकलणारे पाश्चात्य मॉडेल आहे आणि युरोपियन युनियनच्या मूल्यांचा अपमान आहे. तथापि, डेन्मार्क सरकारचे मत असे की हे धोरण 'सततचा प्रवाह थांबवून' प्रत्यक्ष गरजू लोकांना, म्हणजेच शिबिरांत अडकलेल्या लाखो निर्वासितांना, अधिक न्याय्य मदत करण्याचा मार्ग आहे. 'डेन्मार्क मॉडेल'चे आर्थिक आणि सामाजिक परिणामही अपेक्षित आहेत. डेन्मार्क निर्वासितांच्या संख्येवर कठोर नियंत्रण ठेवतो. देशाचा कराधार छोटा असून लोकसंख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे अनियोजित स्थलांतर दीर्घकालीन आव्हान निर्माण करू शकतो. याचा परिणाम म्हणून 'किमान खर्च, जास्तीत जास्त व्यवस्थापन' अशी धोरणात्मक दिशा ठरवण्यात आली आहे. डेन्मार्कमध्ये निर्वासितांसाठीची सर्वात महत्त्वाची अट म्हणजे कल्याण मिळवायचे असेल तर रोजगार बाजारात सहभागी व्हा. भाषा क्लासेस, व्यवसाय प्रशिक्षण, स्थानिक कंपन्यांमध्ये तात्पुरत्या नोकऱ्या आणि स्टार्टअप्स प्रोत्साहन योजना या चतु:सुत्रीद्वारे निर्वासितांना 'स्वावलंबी नागरिक' बनविणे हेच आहे. रोजगार न मिळाल्यास निर्वासितांवर दंडात्मक कारवाई होत नाही, पण काही कल्याण सुविधा मर्यादित केल्या जातात. डेन्मार्कमध्ये संस्कृती, धर्म आणि मूल्यांच्या प्रश्नावर पुरोगामी आणि रुढीवादी गटांमध्ये मोठे राजकीय मतभेद आहेत. 'सहाय्य करायचे, पण काटेकोर नियमांसह' अशा प्रकारची धारणा डेन्मार्कमध्ये निर्वासित व्यवस्थापनाबाबत आहे. आश्रय ही मानवी हक्कांमध्ये गणली जाणारी मूलभूत गरज आहे. तात्पुरता आश्रय हे निर्वासितांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकते, असे मानवाधिकार संघटनांचे म्हणणे आहे. यासंदर्भात डेन्मार्क सरकार म्हणते की, निर्वासितांना हमी दिलेले जीवनमान येथे मिळते. समाकलन कार्यक्रम जास्त काटेकोर असले तरी तेच सामाजिक स्थैर्य टिकवतात. अनधिकृत स्थलांतर रोखण्यासाठी कठोर धोरणे आवश्यक आहेत.

Printed, Published and Owner by ASHWINI SHRIKANT DAROLE on behalf of Marathi Weekly NIRBHID VARTMAAN, printed at Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shaniwar Peth, Pune -411030 (Maharashtra) Publish at- 607, Faluni Bldg, Near Icici Bank, NDA Road Near, Uttam Nagar, Shivne, Pune City, Pune - 411023 (Maharashtra) Editor - ASHWINI SHRIKANT DAROLE Cont. No - 9637777003
PRGI NO:- MAHMAR/2023/90686, DECL NO:- SDM/SR/74/2023

मुद्रक, प्रकाशक आणि मालक सौ.अश्विनी श्रीकांत दारोळे, यांचे नावे मराठी साप्ताहिक निर्भीड वर्तमान, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या शेजारी, ५३५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण: ६०७, फाल्गुनी बिल्डींग, आयसीआयसीआय बँकेशेजारी, एनडीए रोड, उत्तम नगर, शिवणे, पुणे शहर, पुणे ४११०२३ महाराष्ट्र. संपादक : अश्विनी श्रीकांत दारोळे संपर्क - ९६३७७७७००३ (अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या लेख व जाहिरात यांचेशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही सदरचे वाद विवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)
पीआरजीआई क्र. MAHMAR/2023/90686 डि.क्र:- SDM/SR/74/2023

# नागरिकांना तातडीचा दिलासा! मंडळ कार्यालये बळकट करण्याच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणे अधिकाऱ्यांना महागात; जिल्हाधिकाऱ्यांचे 'ऑन द स्पॉट' आदेश

**अहिल्यानगर (प्रतिनिधी):-** गावातील नागरिकांना सरकारी दाखले, ७/१२ उतारे आणि विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दूर असलेल्या तहसील कार्यालयात जावे लागू नये, यासाठी सरकारने गावाजवळच 'मंडळ अधिकारी कार्यालये' बळकट करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी या महत्त्वाच्या सरकारी निर्णयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे.

सामाजिक कार्यकर्ते दीपक पाचपुते यांनी ही गंभीर तक्रार थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मांडल्यानंतर, प्रशासन खडबडून जागे झाले आहे. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी या निष्क्रियतेची गंभीर दखल घेत दोषी अधिकाऱ्यांना तातडीने आणि कठोर कारवाईचे आदेश जारी केले आहेत.

### सरकारचा आदेश काय सांगतो?

महसूल व वन विभागाने दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी एक महत्त्वाचा शासन निर्णय (ऋठ) जारी केला होता.

उपस्थिती बंधनकारक: त्यानुसार, ग्राम महसूल अधिकारी (तठज) यांनी आठवड्यातील चार दिवस 'सजेच्या चावडीत' आणि एक दिवस मंडळ कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे.

सेवा एकाच ठिकाणी: प्रत्येक मंडळ कार्यालयात 'आपले सरकार केंद्र' सुरू करून नागरिकांना महसूल दाखले, जमीन उतारे, विमा सेवा आणि विविध शासन योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे अपेक्षित होते.

### तक्रारीत काय उघड झाले?

या शासन निर्णयाला दीड महिना होऊनही अंमलबजावणी झालेली नव्हती. दीपक पाचपुते यांनी केलेल्या तक्रारीनुसार जिल्ह्यात खालीलप्रमाणे गंभीर त्रुटी आढळल्या:

अधिकारी गैरहजर: ग्राम महसूल अधिकारी नेमून दिलेल्या वेळेत चावडीत हजर राहत नव्हते.

पर्यवेक्षण कमी: मंडळ अधिकाऱ्यांचे या कामावर अपुरे लक्ष होते.

सेवा नाही: अनेक ठिकाणी 'आपले सरकार केंद्र' अजूनही सुरू झालेले नव्हते.

नागरिकांची धावपळ: परिणामी, साध्या ७/१२ उताऱ्यासाठी आणि दाखल्यांसाठी नागरिकांना आजही तहसील कार्यालयांची धावपळ करावी लागत होती.

### जिल्हाधिकाऱ्यांनी दिला अल्टिमेटम

नागरिकांची अडचण आणि शासन निर्णयाकडे झालेले दुर्लक्ष या दोन्ही गोष्टींची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी महसूल विभागाला स्पष्ट निर्देश दिले आहेत:

उपस्थितीचा अहवाल: मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची उपस्थिती तातडीने तपासून अहवाल सादर करावा.

तत्काळ अंमलबजावणी: १० ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयातील सर्व तरतुदींची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू करावी.

केंद्रे सुरू करा: 'केंद्रीकृत मंडळ कार्यालय' आणि 'आपले सरकार केंद्र' त्वरित सुरू करून लोकांना स्थानिक स्तरावर सेवा उपलब्ध करून द्यावी.

जाब विचारणार: झालेल्या विलंबासाठी जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण (जाबजबाब) मागवावा.

जिल्हाधिकारी आशिया यांनी ठामपणे सांगितले की, नागरिकांना महसूल सेवा गावपातळीवर मिळणे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. अंमलबजावणीत झालेला विलंब कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी.

सामाजिक कार्यकर्ते दीपक पाचपुते यांच्या तक्रारीवर प्रशासनाने तातडीने हालचाल केल्याने आणि जिल्हाधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घेतल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आता समाधान व्यक्त केले जात आहे. मंडळ स्तरावरील सेवा लवकरच सुरळीत सुरू होतील, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

---

## आयटी पार्क हिंजवडीतील अपघातानंतर मद्यपी चालकांवर कारवाईचा बडगा

**पिंपरी :** हिंजवडीतील आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या मद्यपी चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातामध्ये बहीण-भावासह तिघांचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी मद्यपी चालकांवरील कारवाई तीव्र केली आहे. श्वास विश्लेषक यंत्र (ब्रेथ नालायझर) यंत्राद्वारे चालकांची तपासणी केली जाणार आहे. हिंजवडी परिसरात मागील अकरा महिन्यांत मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २८९ चालकांवर कारवाई करून गुन्हे दाखल केले आहेत.

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरात एकशेतीसहून अधिक नामांकित कंपन्या आहेत. त्यामुळे दररोज तीन ते चार लाख लोकांची ये-जा असते. पुणे, पिंपरी-चिंचवडच्या भागातून अभियंते हिंजवडीत येतात. या परिसरात बांधकामेही मोठ्या संख्येने सुरू आहेत. त्यामुळे जड, अवजड वाहने, कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना ने-आण करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली असून, रस्ते अरुंद आहेत. रस्त्यांची दुरवस्था आहे. त्यामुळे हिंजवडी परिसरात सातत्याने अपघात होत असल्याचे पोलिसांचे निरीक्षण आहे. मागील ११ महिन्यांत हिंजवडी, वाकड परिसरात अपघातामध्ये ४० जणांचा मृत्यू झाला आहे.

**हिंजवडीत २८९ मद्यपी चालकांवर कारवाई**

हिंजवडी परिसरात मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर नियमितपणे कारवाई केली जात आहे. श्वास विश्लेषक यंत्राद्वारे चालकांची तपासणी केली जात आहे. एक जानेवारी ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २८९ चालकांवर कारवाई केली आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. मद्यपी चालकांवरील कारवाई तीव्र केली जाणार असल्याचे हिंजवडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी सांगितले.

**उपचारादरम्यान १६ वर्षीय मुलीचा मृत्यू**

कर्मचाऱ्यांना घेऊन जाणारी बस नियंत्रण सुटून पदपथावर चढल्याने झालेल्या अपघातात बहीण-भावाचा जागीच मृत्यू झाला होता. जखमी झालेल्या त्यांच्या १६ वर्षीय मोठ्या बहिणाचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर एकजण गंभीर जखमी आहे. या अपघातामधील मृतांची संख्या तीन झाली आहे.

**बसमालक, कंपनीच्या पर्यवेक्षकावर गुन्हा**

बसचालक मद्याच्या नशेत असल्यास त्याच्याकडून अपघात होऊन लोकांचा मृत्यू होऊ शकतो याची जाणीव असताना बसचे मालक, कंपनीचे पर्यवेक्षक व इतर संबंधित व्यक्तींनी चालकाची तपासणी न करता त्याला बस चालविण्यास दिली. त्यामुळे बसमालक, कंपनीच्या पर्यवेक्षकांसह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बसचालक नागनाथ राजाभाऊ गुजर (वय ३६, रा. भोसरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी स्वप्नील पांडुरंग जांभूळकर यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

---

## सोलापूर महानगरपालिकेकडून महत्त्वपूर्ण डिजिटल पाऊल, विकसकांसाठी बांधकाम परवाना NOC आता पूर्णपणे ऑनलाईन

**सोलापूर:** सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने शहर विकास प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. मा. महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार, महानगरपालिकेने बांधकाम परवाना (ईीळश्रवळपस झशीाळीळेप) आणि अंतिम लेआऊट मंजुरीसाठी आवश्यक असलेले विविध विभागांचे ना-हरकत दाखले (छजउ) प्राप्त करण्याची सुविधा आता पूर्णपणे ऑनलाईन उपलब्ध करून दिली आहे.

या नव्या डिजिटल प्रणालीचा प्रारंभ झाल्यामुळे बांधकाम परवाना व लेआऊट मंजुरीची संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुटसुटीत आणि वेगवान होणार आहे, अशी माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली आहे.

### संकेतस्थळावर थेट अर्ज करण्याची सुविधा

विकसक, आर्किटेक्ट आणि नागरिक आता सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर ुिं.ीश्ररीींलेीरींळेप. सीं.ळप या सुविधेचा थेट लाभ घेऊ शकतात. ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे आता विकसकांना ना-हरकत दाखल्यांसाठी (छजउ) वेगवेगळ्या विभागांत शारीरिकरीत्या जाण्याची गरज पूर्णपणे संपुष्टात आली आहे.

### 'या' विभागांचे छजउ मिळणार ऑनलाईन

बांधकाम आणि लेआऊट मंजुरीसाठी अत्यावश्यक असलेले खालील प्रमुख विभागांचे NOC आता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून मिळवता येणार आहेत:

रस्ते विभाग
पाणीपुरवठा विभाग
ड्रेनेज विभाग
विद्युत विभाग
तसेच, अन्य संबंधित नागरी सुविधा विभाग.

ऑनलाईन अर्जासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे

प्रक्रिया जलद होण्यासाठी विकसकांनी ऑनलाईन अर्ज करताना खालील महत्त्वपूर्ण कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे:

प्राथमिक लेआऊटची मंजूर प्रत.
७/१२ उतारा (सातबारा).
पूर्वगणनपत्रक.
संबंधित जागेची घचड फाइल.
इतर तांत्रिक किंवा पूरक कागदपत्रे.

पारदर्शकतेत वाढ आणि वेळेची बचत

या प्रणालीतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अर्जाची सद्यस्थिती पाहण्याची सुविधा. विकसक व आर्किटेक्ट त्यांच्या लॉगिनमधून सादर केलेल्या सर्व अर्जांची प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती तात्काळ ऑनलाईन पाहू शकतात.

यामुळे प्रक्रियेत अधिकाधिक पारदर्शकता येऊन, मंजुरीसाठी लागणाऱ्या वेळेत लक्षणीय बचत होणार आहे. सोलापूर महानगरपालिकेचे हे पाऊल शहर विकासाच्या दृष्टीने एक मोठे वळण ठरणार आहे.

---

## नीलेश घायवळच्या साथीदाराकडून तब्बल ४०० काडतुसे जप्त; दोनशे काडतुसे वापरले; रिकाम्या पुंगळ्या जप्त

**पुणे :** कोथरूड गोळीबार प्रकरणातील गुंड नीलेश घायवळ याच्या साथीदाराच्या घरात तब्बल ४०० काडतुसे सापडली आहेत. त्यापैकी २०० काडतुसे (जिवंत) आहेत. उर्वरित २०० काडतुसांचा वापर करण्यात आला असून, पोलिसांनी रिकाम्या पुंगळ्या जप्त केल्या आहेत. घायवळ टोळीतील गुंडांनी १७ सप्टेंबर रोजी कोथरूडमधील शास्त्रीनगर परिसरात एकावर पिस्‍तुलातून गोळीबार केला होता. याप्रकरणात घायवळ टोळीतील गुंड अजय महादेव सरोदे याला अटक करण्यात आली होती. याप्रकरणात घायवळ याच्यासह साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. घायवळ बनावट कागदपत्रांद्वारे पारपत्र मिळवून लंडनमध्ये गेल्याची माहिती तपासात मिळाली आहे. घायवळच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलीसांनी ब्रिटीश उच्चायुक्तांसी पत्रव्यवहार केला आहे. घायवळला ताब्यात घेण्यात घेण्यासाठी रेड कॉर्नर नोटीस बजाविण्यात आली आहे. 'याप्रकरणात अटकेत असलेल्या सरोदे याची चौकशी करण्यात आली होती. त्याच्या घराची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्या घरातून तब्बल चारशे काडतुसे जप्त करण्यात आली. त्यापैकी २०० काडतुसांच्या पुंगळ्या सापडल्या आहेत', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. सरोदे याच्याकडे शस्त्र परवाना आहे. त्याला २९ जानेवारी २०२४ रोजी परवाना मंजुर करण्यात आला होता. सरोदे याच्याविरुद्ध यापूर्वी दोन गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यात त्याची निर्दोष मुक्तता झाली. पिस्तूल परवाना देताना सरोदे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली होती का नाही? याबाबत प्रश्न उपस्थित झाला आहे.

---

## 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम; गिनीज बुकमध्ये नोंद!

**छत्रपती संभाजीनगर:-** महाराष्ट्राने 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत ऐतिहासिक कामगिरी करत एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. महावितरण कंपनीने एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला आहे. या अभूतपूर्व कामगिरीची नोंद आता गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्र्समध्ये झाली आहे.

या विश्वविक्रम प्रमाणपत्राचे वितरण छत्रपती संभाजीनगरजवळील शेंद्रा एमआयडीसीमधील ऑरिक सिटी मैदानावर एका भव्य सोहळ्यात पार पडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत गिनीज बुकच्या प्रतिनिधींनी हे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान केले. या सोहळ्याला अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्र्सचे कार्ल सॅबेले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. शेतीत सौर ऊर्जेचा वापर वाढवून शेतकऱ्यांना लाभ पोहोचवण्याचा राज्याचा उद्देश आहे. भविष्यात शेतकऱ्यांसाठी वीज वाहिन्या (फिडर) सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्रपणे १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्याची योजना आहे. त्यामुळे इतर वापरासाठीच्या विजेच्या दरात दरवर्षी तीन टक्के कपात करता येईल, परिणामी ग्राहकांना स्वस्त वीज देणे शक्य होईल, असे महत्त्वाचे प्रतिपादन त्यांनी केले. महाराष्ट्राचा हा विक्रम केवळ राज्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद आणि ऊर्जा क्षेत्रात क्रांती घडवणारा आहे.

## पुणे परिवहन कार्यालयाची कारवाई: शालेय बस नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २४९ वाहनांवर दंड

**पुणे (प्रतिनिधी):-** पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने या वर्षी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कार्यालयाने केलेल्या तपासणीत शालेय बस नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या अनेक वाहनांना दणका दिला आहे.

या वर्षी, परिवहन कार्यालयामार्फत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या एकूण १ हजार ४६४ वाहनांची तपासणी करण्यात आली. ही तपासणी विद्यार्थ्यांची सुरक्षा मानके पूर्ण होत आहेत की नाहीत, हे पाहण्यासाठी केली गेली. तपासणीनंतर एकूण २४९ वाहने शालेय बस नियमांचे उल्लंघन करताना आढळली. ही वाहने स्कूल बस तसेच व्हॅन प्रकारातील होती.

या कारवाईत प्रामुख्याने वाहनचालक आणि मदतनीस यांची पोलिस विभागाकडून चारित्र्य पडताळणी केलेली नसणे, वाहनांमध्ये गती नियंत्रक यंत्र (स्पीड गव्हर्नर) आणि आग विझवण्यासाठीची साधने (अग्निशमन यंत्रणा) यांचा अभाव असणे ही गंभीर कारणे समोर आली. तसेच, अनेक वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) आणि विमा प्रमाणपत्र यांची मुदत संपलेली होती. अनेक ठिकाणी आसन क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरले जात होते.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने या २४९ दोषी वाहनांवर कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली असून, नियमांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही हे स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वात महत्त्वाची असल्यामुळे परिवहन विभाग आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम यापुढेही नियमितपणे आणि अधिक कठोरपणे राबवली जाईल.

## जमीन-जुमला आता डिजिटल: ७/१२ उतारा झाला 'स्मार्ट'

**पुणे:-** जुन्या कागदपत्रांची अडचण आपल्याला माहितीच आहे, जमीन म्हणजे शेतकऱ्यासाठी सर्वस्व. पण जमिनीचा महत्त्वाचा कागद म्हणजे ७/१२ (सातबारा) उतारा. पूर्वी हा उतारा मिळवण्यासाठी तलाठी कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागायच्या. कधी कागद फाटलेला, कधी नोंदी अस्पष्ट. त्यात जर नोंदीत काही बदल (फेरफार) करायचा असेल, तर अजून मोठा त्रास. फसवणुकीची भीती आणि वेळेचा अपव्यय ठरलेला होता.

पण आता चित्र बदलले आहे. 'ई-फेरफार' नावाच्या एका खास संगणकीय प्रणालीमुळे महसूल विभागात मोठा बदल झाला आहे. कल्पना करा, ही प्रणाली म्हणजे एक शक्तिशाली 'डिजिटल डायरी' आहे, ज्यात तुमच्या जमिनीची प्रत्येक नोंद अगदी सुरक्षितपणे ठेवलेली आहे.

यामुळे आता जमिनीच्या नोंदीत कोणताही बदल करायचा असेल, तर तो थेट कॉम्प्युटरमध्ये होतो आणि त्याचे पुरावे लगेच उपलब्ध होतात.

या बदलातील खरी जादू आहे 'डिजिटल स्वाक्षरी' मध्ये याचे महत्त्व असे आहे की नकलीची भीती नाही ७/१२ उताऱ्यावर जेव्हा ही 'डिजिटल स्वाक्षरी' होते, तेव्हा तो उतारा १००% खरा आणि कायदेशीर ठरतो. तुम्ही तो बँकेत दाखवा किंवा कोर्टात, त्याला पूर्ण मान्यता मिळते.

सुरक्षितता: एकदा ही डिजिटल सही झाली की, त्या कागदात कोणीही छेडछाड करू शकत नाही. कोणी नोंदी बदलण्याचा प्रयत्न केला, तर लगेच कळते. याचा अर्थ, तुमच्या जमिनीचे रेकॉर्ड आता सुरक्षित व्हॉल्ट मध्ये ठेवल्यासारखे झाले आहेत.

तात्काळ सेवा: आता उतारा मिळवण्यासाठी तासन्तास वाट पाहावी लागत नाही. एका क्लिकवर तुमचा 'स्मार्ट' ७/१२ उतारा तयार होतो!

भाग ४: नोंदी झाल्या अधिक चांगल्या

या नवीन प्रणालीने फक्त ७/१२ उताराच नाही, तर इतर नोंदीही सुधारल्या आहेत:

८-अ उतारा (जमाबंदी): यात आता तुमच्या 'लागवडी योग्य जमीन' आणि 'लागवडीस अयोग्य जमीन' याची स्पष्ट नोंद असते. त्यामुळे तुम्हाला कोणत्या जमिनीवर कर (महसूल) भरावा लागेल, हे लगेच कळते.

पीक पाणी (गाव नमुना १२): या नोंदीमध्ये आता 'खाते क्रमांक' जोडला आहे. याचा फायदा असा की, पीक विमा घेताना किंवा अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यावर मदत मिळवताना, तुमच्या पिकाची माहिती खातेनिहाय तपासली जाते, ज्यामुळे तुम्हाला योग्य आणि अचूक मदत मिळते.

डिजिटल स्वाक्षरी आणि ई-फेरफारमुळे आता जमिनीच्या नोंदी अधिक सोप्या, पारदर्शक आणि विश्वासार्ह झाल्या आहेत. शेतकऱ्यांचे कष्ट वाचले आहेत आणि महसूल विभागाचे कामही जलद झाले आहे.आता तुमचा ७/१२ उतारा 'डिजिटल' आहे आणि तो तुमच्या मोबाईलमधील प किंवा कॉम्प्युटरवर कधीही उपलब्ध होऊ शकतो!

## पारदर्शक कारभारासाठी महसूल विभागाचा नवा 'वॉचमन'; गैरव्यवहारांना बसणार लगाम

**मुंबई:-** सरकारी काम म्हणजे वेळकाढूपणा आणि कधी कधी गैरव्यवहार, असा अनुभव अनेक लोकांना येतो. विशेषतः महसूल विभागात जिथे जमीन-जुमल्याची आणि महत्त्वाच्या कागदपत्रांची कामे असतात, तिथे पारदर्शकता नेहमीच एक मोठा प्रश्न राहिली आहे.

**हिरोची एन्ट्री: 'दक्षता पथके'**

पण आता या सगळ्यावर 'वॉच' ठेवण्यासाठी आणि सामान्य नागरिकांची कामे जलद व्हावीत म्हणून, महसूल विभागाने एक नवीन आणि दमदार पाऊल उचलले आहे. त्यांनी प्रत्येक विभागात एकूण ७ विशेष दक्षता पथके स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या पथकांना आपण महसूल विभागाचे 'वॉचमन' म्हणू शकतो.

**वॉचमनचे काम काय?**

या वॉचमनचे काम अगदी स्पष्ट आहे:

तक्रारींची चौकशी: जमीन मोजणी, वाळू-खनिज संबंधीचे गैरव्यवहार किंवा मुद्रांक शुल्कमध्ये होणाऱ्या गडबडीबद्दलच्या गंभीर तक्रारींची ते थेट चौकशी करतील.

जलद निकाल: कोणतीही तक्रार आल्यास, त्याचा प्राथमिक अहवाल अवघ्या १५ दिवसांत सादर करायचा आहे (इतर तक्रारींसाठी ३० दिवस). म्हणजे, 'काम लांबवा' ही प्रवृत्ती आता चालणार नाही!

कडक कारवाई: जर चौकशीत कोणी अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळला, तर त्यांच्यावर नियमांनुसार कडक शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. कागदपत्रे लपवणाऱ्या अधिकाऱ्यांनाही सोडले जाणार नाही.

**मंत्र्यांची टीम**

या 'वॉचमन'च्या कामावर नजर ठेवण्यासाठी आणि त्यांना मदत करण्यासाठी महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक मोठी समिती स्थापन करण्यात आली आहे. म्हणजे, ही योजना फक्त कागदावर न राहता, तिची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी यासाठी खुद्द मंत्र्यांनी कंबर कसली आहे.

**याचा फायदा कोणाला?**

हा निर्णय थेट सामान्य नागरिकांच्या हिताचा आहे. या पथकांमुळे महसूल विभागातील कामे आता जास्त वेगाने होतील आणि गैरव्यवहार करणारे अधिकारी पकडले जातील. यामुळे, 'पारदर्शक आणि लोकाभिमुख'

महसूल प्रशासन तयार होण्यास मदत मिळेल.

## बी.टेक विद्यार्थ्याचे धक्कादायक कृत्य; आई, वडीलांना धक्का, पोलिसही चक्रावले

**धुळे :** पुण्यात शिक्षणासाठी गेल्यावर तेथील झगमगाटी आयुष्याच्या प्रेमात पडलेल्या 'बी, टेक'च्या विद्यार्थ्याचे कारनामे उघड झाल्यावर खुद्द त्याच्या कुटुंबातल्या सदस्यांनाच धक्का बसला. चोरीचा बनाव करून ८ ते ९ तोळे सोन्याचे दागिने त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने स्वत:च्याच घरातून लांबविले. पैकी काही शेतात पुरून ठेवले तर काही सराफाकडे विकल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

जिल्ह्यातील साक्री येथील सुयोग कॉलनी, प्लॉट नं. ३४, पेरेजपूर रोड वरील घरफोडीच्या कथित घटनेने सुरुवातीला खळबळ उडवली होती. गुरुवार (दि. ३०) रोजी सायंकाळी सहा ते सात वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सोन्याच्या वस्तू चोरून नेल्याची तक्रार सोमवारी (दि.१) नोंदविण्यात आली होती.

या प्रकरणी भावेश संजय नेरकर (२० रा. वसमात, ता. साक्री) याने फिर्याद दिली होती. सद्या तो बी-टेकचे शिक्षण घेण्यासाठी पुण्यात वास्तव्यास आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आणि विशेष पथकानेही तपास सुरु केला. तपास जसा पुढे सरकला तशी धक्कादायक माहिती तपास अधिकाऱ्यांना मिळू लागल्याने या घटनेचे गांभीर्य अधिकच वाढले. प्राथमिक तपासात ही घरफोडी प्रत्यक्षात घडलीच नसून, भावेश नेरकर यानेच आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने स्वतः:च्या घरात बनावट घरफोडीचा कट रचल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे.

पुण्यातील झगमगत्या जीवनशैलीची सवय आणि पैशांची गरज भागवण्यासाठी, आई-वडीलांना काहीही कल्पना न देता त्याने घरातील सोन्याचे दागिने लपवून खोटी तक्रार दिल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून आता या दिशेनेच या प्रकरणाचा तपास सुरु झाला आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी भावेश तसेच त्याच्या दोन्ही साथीदारांना ताब्यात घेतले असून, चोरी झाल्याचा बनावातून नेल्यात आलेले सुमारे ८ ते ९ तोळे सोन्याचे दागिनेही जप्त केले आहेत. यापैकी दोन तोळे सोने त्याने एका सराफाकडे विकल्याचे तर अर्धा तोळा सोने शेतात पुरल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी बांबळे, पोलीस निरीक्षक वळवी आणि पोलीस उपनिरीक्षक महेश घायतड हे पुढील तपास करीत आहेत. घरफोडीचा बनाव उघडकीस आल्याने साक्री शहरात एकच खळबळ उडाली असून, तरुण पिढीवर होणाऱ्या वाईट संस्कारांबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. सध्या पोलिसांचा पुढील तपास सुरू असून, आरोपींविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## अग्नी सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र बंधनकारक

**पिंपरी :** पिंपळेसौदागर येथील व्यावसायिक इमारतीमधील खासगी शिकवणी वर्गाला आग लागल्यानंतर आता महापालिकेने शहरातील सर्व शिकवणी वर्ग, शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे अशा विविध शैक्षणिक संस्थांसाठी अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्नी सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. शैक्षणिक संस्थांनी अग्निशमन विभागामध्ये ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून अधिकृत अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन अग्निशमन विभागाने केले आहे.

शहरातील कोणतीही शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालय, खासगी शिकवणी वर्ग, अकादमी किंवा प्रशिक्षण केंद्र हे अग्निसुरक्षेच्या नियमांपासून मुक्त नाहीत. अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन मार्ग, फायर अलार्म प्रणाली तसेच प्रशिक्षित कर्मचारी यांची उपलब्धता ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे. त्यामुळे नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर कारवाई केली जाणार आहे.

विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा उपाय असणे गरजेचे असून, सर्व संस्थांनी निर्धारित नियमांचे पालन करावे. व्यावसायिक वापर असलेला परिसर अग्नी सुरक्षित करणे, ठेवणे ही संबंधित संस्था चालक-मालक यांची जबाबदारी आहे. शैक्षणिक संस्थेची, शिकवणी वर्गाची नोंदणी व आवश्यक अग्नी सुरक्षितता उपाय योजना केल्यास गंभीर दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होईल. अग्निसुरक्षा प्रणाली नियमितपणे अद्ययावत ठेवावी, असे आवाहन अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांनी केले.

महापालिकेने अग्निसुरक्षा तपासणी व नोंदणी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. https://noncoreerp.pcmcindia.gov.in/login या संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध आहे. अग्निशमन विभागामार्फत 'क्यूआर कोड' प्रसिद्ध करण्यात आला आहे. हा कोड स्कॅन करून आवश्यक कागदपत्रे सादर करून नोंदणी आणि अग्निसुरक्षा प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येणार आहे.

## ''संघासाठी आत्मपरीक्षणाची वेळ'

**पुणे :** 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून एकीकडे गौरव, कृतज्ञता व्यक्त करण्यात आहे. मात्र, दुसरीकडे संघासाठी ही आत्मपरीक्षणाची वेळ आहे. संघाला शंभर वर्षे पूर्ण करायची नव्हती. त्यापूर्वीच आपले काम पूर्ण करायचे होते. मात्र, हे झाले नाही. त्याला अनेक कारणे आहेत,' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सोमवारी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'कृतज्ञता सोहळ्या'त भागवत बोलत होते. कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती, प्रतिष्ठानाचे अध्यक्ष विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, अपर्णा अभ्यंकर, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आदित्य अभ्यंकर आदी या वेळी उपस्थित होते.

## सराईत चोरटा 'बाळू' जेरबंद; २ बाईक आणि १० मोबाईलसह १.८० लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**पुणे (प्रतिनिधी):-** पुणे शहरात चोरी आणि घरफोडी करून पोलिसांच्या रेकॉर्डवर असलेल्या एका सराईत चोरट्याला बिबवेवाडी पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. या आरोपीच्या अटकेमुळे बिबवेवाडी आणि जेजुरी पोलीस स्टेशनमधील चोरीचे मोठे गुन्हे उघडकीस आले असून, पोलिसांनी तब्बल १ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**नेमका गुन्हा काय घडला?**

ही कारवाई बिबवेवाडी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या एका वाहन चोरीच्या गुन्ह्यावरून सुरू झाली. १० ऑक्टोबर २०२५ रोजी एका फिर्यादी महिलेची दुचाकी गाडी चोरीला गेल्याची तक्रार बिबवेवाडी पोलीस स्टेशनमध्ये दाखल होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते यांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष पथकाला सूचना दिल्या.

**चोरटा असा सापडला जाळ्यात**

तपास पथकातील पोलीस अंमलदार आशिष गायकवाड आणि विशाल जाधव यांना त्यांच्या गुप्त बातमीदारांकडून एक महत्त्वाची खबर मिळाली. ती म्हणजे, १६ एकर मोकळ्या मैदानात एक संशयित इसम चोरीची दुचाकी घेऊन थांबलेला आहे.

माहिती मिळताच, तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेतली. तिथे त्यांना एक व्यक्ती संशयितरित्या थांबलेला आढळला.

त्याला ताब्यात घेऊन चौकशी केल्यावर त्याने आपले नाव बाळू प्रभाकर चव्हाण (वय ३८, रा. जुन्नर, जि. पुणे) असल्याचे सांगितले. अधिक चौकशीत हा आरोपी पोलिसांच्या रेकॉर्डवरील (सराईत गुन्हेगार) असल्याची माहिती समोर आली. त्याने मौजमजेसाठी आणि पैशांसाठी दुचाकी चोरल्याची कबुली दिली.

**२ बाईक, १० मोबाईल चोरीचे गुन्हे उघड**

बिबवेवाडी पोलिसांनी तात्काळ त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटारसायकल जागीच हस्तगत केली.

आरोपी बाळू चव्हाण याच्याकडे अधिक सखोल चौकशी केल्यानंतर त्याने पुणे जिल्ह्यामध्ये आणखी गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. त्याने:

जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतून दोन मोटारसायकल आणि १० मोबाईल चोरल्याचे कबूल केले.

बिबवेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील एका घरफोडीचा गुन्हाही त्याने केल्याचे उघडकीस आले.

यामुळे बिबवेवाडी आणि जेजुरी पोलीस स्टेशनमधील एकूण तीन मोठे गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या मोटारसायकली आणि मोबाईल फोन मिळून एकूण १,८०,००० किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**यशस्वी कामगिरी पथक**

ही उत्कृष्ट कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, मा. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे (परिमंडळ ५), आणि मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती नम्रता देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बिबवेवाडी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुरज बेंद्रे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक अमोल माने आणि पोलीस अंमलदार संजय गायकवाड, विनोद जाधव, संजय आग्रे, आशिष गायकवाड, विशाल जाधव, सुमित ताकपिरे, ज्योतिष काळे, शिवाजी येवले, रक्षित काळे, संतोष बनसुडे, दत्ता शेंद्रे व राहूल खाडे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.